शिक्षा अंतिम करणेबाबत.
(श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत - लौकी,ता. कोपरगाव)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ 2320425 /२०२६
अहिल्यानगर, दिनांक-स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.या कार्यालयाकडील दोषारोप पत्र क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/७०१/२०१५, दिनांक- १०/०७/२०१५.
२.या कार्यालयाचे सेवा निलंबित आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/७००/१५,दिनांक १०/०७/२०१५.
३.श्रीम गायकवाड यांचा दि.१०/०८/२०१५ रोजीचा खुलासा.
४.या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/८५२/२०१७, दिनांक १६/१०/२०१७
५.विभागीय चौकशी अधिकारी यांचेकडील दिनांक १५/०२/२०१८ रोजीचा अहवाल
६.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/११५३/२०१८, दिनांक २९/१०/२०१८.
७.श्रीम गायकवाड यांचा दि.२६/११/२०१८ रोजीचा खुलासा.
८.या कार्यालयाकडील पत्र दिनांक १६/०१/२०१९, स्मरणपत्र क्र.-१ दि.२७/०१/२०२० व स्मरणपत्र क्र.२ दिनांक ०८/०७/२०२१.
९.गटविकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/३६४/२०२२, दि.२१/०३/२०२२
१०.या कार्यालयाकडील अंतिम शिक्षा आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/२८-२०१९/३४३/२०२२,दि.०९/०५/२२
११.मा.अपर आयुक्त,नाशिक यांचेकडील अपील निर्णय क्र.४२/२०२२,दिनांक ०५/०४/२०२३.
१२.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/६२८/२०२३, दिनांक २२/०८/२०२३. (दिनांक ०९/०५/२०२२ च्या आदेशाच्या तारखेपासुन मानीव निलंबन समजणे.)
१३.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/६२६,६२७/२०२३,दिनांक २२/०८/२०२३ (विभागीय चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी नियुक्ती आदेश)
१४.सहा.आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील पत्र क्र. विशा.४/खा.चौ./सी.आर. २४७/२०२३, दिनांक- १३/०९/२०२४ (प्राप्त दिनांक ११/१०/२०२४.)
१५.या कार्यालयाकडील पुन:स्थापित आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र.९०५९१७,दि.०१/०७/२०२५.
१६.या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१३८७७९३/२०२५, दिनांक- ०१/०७/२०२५.
१७. गटविकास अधिकारी पंचायत समिती,संगमनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/४१२०/२५,दिनांक ०१/०९/२०२५ अन्वये श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत -लौकी, ता.कोपरगांव यांचा दिनांक- २२/०८/२०२५ रोजीचा खुलासा. (प्राप्त दिनांक ०१/१०/२०२५.)
१८.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (२)

संदर्भ क्रमांक ०१ अन्वये, श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत लौकी, तालुका कोपरगाव यांच्याविरुध्द दोषारोप बजावण्यात येऊन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली होती. संदर्भ क्र.५ अन्वये विभागीय चौकशी अहवालाच्या अनुषंगाने दोषसिध्दतेच्या अनुषंगाने श्रीम गायकवाड यांची दि.०९/०५/२०२२ रोजी जिल्हा परिषद सेवेतुन काढुन टाकण्यात आले होते. श्रीम गायकवाड यांनी संदर्भ क्र.१० च्या आदेशाविरुध्द मा.अपर आयुक्त नाशिक यांचेकडे अपील दाखल असता दि.०५/०४/२०२३ च्या आदेशान्वये अपील अंशत: मान्य करण्यात येऊन संदर्भ क्र.१० चे आदेश रद्द करुन फेरचौकशी करण्याचे आदेश संदर्भ क्र.१३ अन्वये करण्यात आले होते.

संदर्भ क्र.१२ अन्वये श्रीम गायकवाड के.के.,तत्कालीन ग्रामसेवक मानीव निलंबनात ठेऊन संदर्भ क्र.१४ अन्वये श्रीम गायकवाड यांचे सहाय्यक आयुक्त, (चौकशी) नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला असुन यामध्ये ठेवण्यात आलेले ०४ आरोपांपैकी ०३ आरोप अंशत: सिध्द झाले आहे व ०१ आरोप सिध्द झालेला नाही,असे निष्कर्ष नोंदविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्रीम गायकवाड यांचा संदर्भ क्र.१६ अन्वये अंतिम कारणे दाखवा नोटीसचा खुलासा मागविण्यात आला होता. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन करुन, महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (४) नुसार समय श्रेणीतील निम्न स्तरावर आणण्याची शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतिम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हांस मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक १७ अन्वये श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत लौकी, तालुका कोपरगाव त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. त्यांच्या खुलाश्याचे अवलोकन करता व प्राप्त खुलाश्याच्या अनुषंगाने श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड, तत्कालीन ग्रामसेवक यांना पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने ०२ वर्ष थांबविणे,ही शिक्षा या आदेशान्वये अंतिम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२६०६००९८........ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-04-2026 15:25:38
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्रीम काजलकिरण कमलाकर गायकवाड,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत लौकी, ता.कोपरगाव
द्वारा व प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, जि.अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,संगमनेर

२/- सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. गटविकास अधिकारी, पंचायत समिती,कोपरगाव